सांध्य दैनिक

# विदर्भ प्रजासत्ताक

आजचे तापमान ४६.६

https://epaper.vidarbhaprajasattak.com, follow us on

E-Mail : prajasattaknews24@gmail.com | RNI No. - MAHMAR 2023/84526 | Postel Regi. No. - AMT/RNP 546/2024-2026

❑ वर्ष - ४ थे ❑ अंक - ७६ वा ❑ अमरावती (महाराष्ट्र) ❑ सोमवार दि. २७ एप्रिल २०२६ ❑ संपादक - डॉ. शुभांगी जोशी ❑ मुल्य - १ रु. ❑ पृष्ठ -४

# जेवढा पगार मिळतो..तेवढेच बोलले पाहिजे.. आपली 'लेव्हल' सोडून बोलू नये

## आ.राणांनी घेतला विजय वडेट्टीवारांचा समाचार

**विदर्भ प्रजासत्ताक दि.२७अमरावती:** काँग्रेसचे नेते विजय वडेट्टीवार यांनी वायफळ बोलण्यापेक्षा आपल्या मर्यादेत राहून बोलले पाहिजे. त्यांची औकात किती? त्यांची 'लेव्हल' काय? वडेट्टीवार काय आहेत, काय नाहीत, हे सगळे मला माहित आहे. त्यांनी काँग्रेसकडून मिळणाऱ्या पगारापेक्षा जास्त बोलू नये, अशी बोचरी टीका युवा स्वाभिमान पक्षाचे अध्यक्ष आमदार रवी राणा यांनी केली आहे.

**विजय वडेट्टीवार यांनी केली होती टीका**

नवनीत राणा आम्हाला चिल्लरच समजतात कारण मोदींना त्या ठोक समजतात. आम्ही चिल्लरच आहोत. त्या किती महान आहेत, कारण त्या 'सी-ग्रेड'च्या 'पॉप्युलर हिरोईन' आहे. त्या पडद्यावरच्या तारांकिता आहे, त्यांच्या दृष्टीने आम्ही चिल्लरच असणार, अशी टीका काँग्रेसचे नेते विजय वडेट्टीवार यांनी केली होती. त्यावर प्रतिक्रिया व्यक्त करताना रवी राणा यांनी वड्ेट्टीवार यांच्या वक्तव्याविषयी नाराजी व्यक्त केली.



रवी राणा म्हणाले, माझा विजय वडेट्टीवार यांना एक सल्ला आहे. त्यांच्याही घरी आई, बहीण, मुलगी आहे. महिलांबद्दल कसे बोलले पाहिजे, हे त्यांनी शिकून घ्यावे. 'लव्ह जिहाद'च्या प्रकरणाला तुम्ही पाठिंबा देता, हे ठिक आहे. ती काँग्रेसची परंपरा आहे. तुमच्या रक्तात ते आहे. तुम्ही अशा प्रवृत्तींना पाठीशी घालता, तिथपर्यंत ठिक आहे. पण, एका महिलेविषयी वेगळ्या स्तरावर बोलणे, ही महाराष्ट्राची संस्कृती नाही. म्हणून माझा विजय वडेट्टीवार यांना सल्ला आहे की आपल्या मर्यादित नीट-नेटके राहिले पाहिजे. जेवढा पगार मिळतो, तेवढेच बोलले पाहिजे, आपली 'लेव्हल' सोडून बोलू नये.

रवी राणा म्हणाले, महाराष्ट्राच्या संस्कृतीत महिलांना नेहमी सन्मानाचे आदराचे स्थान राहिले आहे. हा छत्रपती शिवाजी महाराजांचा महाराष्ट्र आहे. वायफळ बोलून आपला कचरा वडेट्टीवारांनी करून घेऊ नये. त्यांची आणि माझी अनेकवेळा भेट होते, पुढच्या भेटीत त्यावेळी मी त्यांना नक्कीच समज देईन. मी देखील वरिष्ठ आमदार आहे. एक लहान भाऊ म्हणून मोठ्या भावाला चांगले वागण्याचा सल्ला देईल.

# जर एका बापाचे असाल तर माझा आव्हान स्वीकारा...

## सरन्यायाधीशांचे बंधू राजेंद्र गवई श्याम मानव यांच्यावर संतापले

**विदर्भ प्रजासत्ताक दि.२७नागपूर:** माजी सरन्यायाधीश भूषण गवई यांनी बागेश्वर उर्फ धीरेंद्र शास्त्री यांची भेट घेतल्याने आता वादाला तोंड फुटले होते. भूषण गवई हे धीरेंद्र शास्त्री महाराजांच्या पाया पडायला गेले होते, याचा आपल्याला प्रचंड धक्का बसला. यापुढे त्यांनी डॉ. बाबासाहेब आंबेडकरांचे नाव घेऊ नये, अशा शब्दात अंधश्रद्धा निर्मुलन समितीचे अध्यक्ष श्याम मानव यांनी भूषण गवई यांच्यावर टीका केली. यानंतर आता या वादात भूषण गवई यांचे बंधू डॉ. राजेंद्र गवई उतरले आहेत. त्यांनी श्याम मानव यांचा समाचार घेत, प्रत्येकच आंबेडकरी नेता गणपती, हनुमानाच्या मंदिरात गेल्याचे भाष्य केले आहे.श्याम मानव यांनी म्हटले होते की, भूषण गवई हे रासू गवई यांचे सुपुत्र आहेत, यापूर्वी विकृत बाबांचा सत्कार दीक्षाभूमीवर घेतला त्यावेळेस मी विरोध केला होता. भूषण गवई म्हणतात की मी स्वतः आंबेडकरी विचाराचा आहे. आंबेडकरी विचारांचे मी दूध पिलो आहे पण तो माणूस जर धीरेंद्र शास्त्री महाराजांच्या पाया पडून आशीर्वाद घेत असेल तर आता तुम्ही यापुढे



आंबेडकरांचे नाव कधीही घ्यायचे नाही. तो अधिकार तुम्ही गमावलेला आहे.भूषण गवई बागेश्वर धामला गेल्याने टीका होत आहे. परंतु प्रत्येक आंबेडकरी नेता हा गणपती मंदिर, हनुमान मंदिर, चर्च, मज्जिद मध्ये गेलेला आहे. समाजात राहत असताना मित्रांच्या आग्रहाखातर कधी कधी जावे लागते. पण मी त्याबद्दल बोलत नाही भूषणजी त्यावर बोलतील. मी श्याम मानव यांना आव्हान देतो की, भूषणजींना नंतर रोखा आधी हिंमत असेल तर मला रोखा. तुम्ही म्हणाल त्या ठिकाणी एकटा निशस्त्र येईल. तुम्ही जर एका बापाचे असाल तर माझा आव्हान स्वीकारा, असे आवाहनच राजेंद्र गवई यांनी केले.

# बागेश्वर धामचे धीरेंद्र शास्त्री लग्न बंधनात अडकणार, स्वतःच माहिती दिली

विदर्भ प्रजासत्ताक

**दि.२७नागपूर-** नागपूरमध्ये एका कार्यक्रमात बागेश्वर बाबा म्हणून ओळख असलेले धीरेंद्र कृष्ण शास्त्री यांनी राष्ट्रीय स्वयंसेवक संघाचे तोंडभरून कौतुक केले. इतकेच नाही, तर त्यांनी यानंतर केलेल्या एका वक्तव्याने खळबळ उडवली आहे. बागेश्वर बाबा यांनी प्रत्येक हिंदूने चार मुले जन्माला घालावी असे सांगितले. यावर मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनाही प्रतिक्रिया द्यावी लागली. यानंतर आता बागेश्वर बाबा यांनी स्पष्टीकरण दिले असून केवळ इतरांनी चार मुले जन्माला घालावी असे नसून मी स्वतः गृहस्थ जीवन जगणार असल्याचे स्पष्ट केले.

लग्नाबद्दल नेमके काय म्हणाले?

धीरेंद्र शास्त्री यांनी चार मुले जन्माला घालून एक मुलगा राष्ट्रीय स्वयंसेवक संघाला द्या, असे वक्तव्य केले होते. यावरूनही वाद निर्माण झाला होता. यावर शास्त्री यांनी यावर स्पष्टीकरण देत, पुढे जाऊन मी पण गृहस्थ होणार आहे. त्यामुळे मी केवळ लोकांना सल्ला देत नाही असेही ते म्हणाले. चार मूल जन्माला घालून एक संघाला समर्पित करा याचा अर्थ सैन्याला द्या, शिक्षक बनवा, राष्ट्रप्रेमी बनवा असे आवाहन त्यांनी केले.

कुणाशी लग्न होणार ?

दोन वर्षांपूर्वी भजन आणि भागवत कथेसाठी देश-विदेशात



प्रसिद्ध असलेल्या जया किशोरी यांच्यासोबत बागेश्वर बाबा लग्न करणार असल्याची लग्नाची अफवा पसरवण्यात आली होती. दरम्यान, एका एमबीबीएसच्या तरूणीने धीरेंद्र शास्त्री यांच्यासोबत लग्न करण्याची इच्छा व्यक्त केली होती. संबंधित विद्यार्थिनीने तिची इच्छा पूर्ण व्हावी यासाठी डोक्यावर गंगाजल घेऊन गंगोत्री धाम ते बागेश्वर धाम अशी पदयात्रा देखील सुरू केली आहे. लक्षणीय बाब म्हणजे विद्यार्थिनीचे वडील आणि भाऊही तिच्यासोबत पदयात्रा काढली होती. ती बागेश्वर बाबांसोबत लग्न करण्यास इच्छुक आहे. तसेच मी धीरेंद्र शास्त्री यांना माझा प्राणनाथ म्हणून स्वीकारले आहे. त्यामुळे माझी इच्छा पूर्ण करण्यासाठी बागेश्वर धामला जात आहे, असं शिवरंजनीने सांगितले होते. मात्र बाबा आता कुणाशी लग्न करणार हे येणारी वेळच ठरवेल.

अंधश्रद्धेला प्रोत्साहन देत नाही

आम्हाला श्याम मानव किंवा अन्य कुणाच्या प्रमाणपत्राची गरज नाही. आमचा दरबार कुठल्याही अंधश्रद्धेला प्रोत्साहन देत नसून चमत्काराच्या नावाने होणाऱ्या धर्मांतरणाला रोखण्यासाठी आहे, असेही बागेश्वर धामचे धीरेंद्र शास्त्री यांनी सांगितले. अखिल भारतीय अंधश्रद्धा निर्मूलन समितीचे (अनिस) अध्यक्ष श्याम मानव यांनी बागेश्वर धामचे धीरेंद्र कृष्ण शास्त्री यांना त्यांच्या 'दिव्य शक्ती' सिद्ध करण्यासाठी ८० लाख रुपयांचे खुले आव्हान दिले आहे. यावर नागपूरमध्ये झालेल्या पत्रकार परिषदेत धीरेंद्र शास्त्री यांनी श्याम मानव यांच्या आव्हानाला उत्तर दिले.



संपादकीय ......

# ‘झाडू’ झडती!

*आम आदमी पक्षातील सात राज्यसभा खासदारांनी पक्षाला रामराम केला. हे सातही खासदार भाजपमध्ये दाखल झाले. खा. राघव चढ्ढा यांच्यासह इतर नेत्यांचा यात समावेश आहे. या फुटीचा ‘आप’ला जबरदस्त फटका बसणार आहे. भ्रष्टाचाराविरोधात एल्गाराची गर्जना करत तेरा वर्षांपूर्वी ‘आप’ची स्थापना झाली. पक्ष संस्थापक अरविंद केजरीवाल सरकारी नोकरी सोडून राजकारणात आले होते. भ्रष्टाचारमुक्त प्रशासनाची हमी देत त्यांनी सत्ता मिळवलीही. तथापि, नाकाने कांदे सोलणार्यांचे जे होते, तेच केजरीवाल यांच्याही कपाळी आले. साधनसुचितेचा अविर्भाव दाखवणारे केजरीवाल मनमानी पद्धतीने वागू लागले.*

*पक्ष स्थापनेपासून खांद्याला खांदा लावून लढणार्या दिग्गज आणि लोकप्रिय नेत्यांवर त्यांनी वक्रदृष्टी ठेवली. त्याचा परिणाम व्हायचा तोच झाला. केजरीवाल यांनी जे स्वप्न दाखवले, तेच मुळी ठिसूळ पायावर उभे होते. बिनीच्या शिलेदारांना कस्पटासमान वागविण्याची त्यांची कृती अंगलट आली आहे. ज्या विश्वासाने लोकांनी ‘आप’ला साथ दिली त्या विश्वासाला तडा गेला. चौदा वर्षांपूर्वी अण्णा हजारे यांनी नवी दिल्लीत भ्रष्टाचाराविरोधात आंदोलन उभारले होते. आंदोलनावेळी केजरीवाल आणि अण्णांमध्ये मतभेद झाले. केजरीवाल बाहेर पडले आणि त्यांनी आम आदमी पार्टीची स्थापना केली. २०१३ मध्ये दिल्ली विधानसभा निवडणुकीत ‘आप’ला ७० पैकी २८ जागा मिळाल्या. काँग्रेसच्या कुबडीने केजरीवाल मुख्यमंत्री झाले. २०१५ च्या विधानसभा निवडणुकीत ‘आप’ने दिल्लीत ७० पैकी ६७ जागा जिंकून विक्रम प्रस्थापित केला.*

*२०२० च्या निवडणुकीत ६२ जागा जिंकून तिसर्यांदा सत्ता मिळवली. केजरीवाल यांनी मुख्यमंत्रिपदाची हॅट्ट्रिक केली. २०२२ मध्ये पंजाब विधानसभा निवडणुकीत पक्षाने ११७ पैकी ९२ जागा जिंकून नवा विक्रम केला. पक्षाने गुजरात, गोवा येथेही निवडणूक लढवली; पण फारसे यश पदरात पडले नाही. पण दिल्ली आणि पंजाबमध्ये लोकांना पर्याय मिळाला. या दोन्ही राज्यांत एकेकाळी प्रबळ काँग्रेस विकलांग झाली. नव्या पिढीने काँग्रेस पक्षाकडे पूर्ण पाठ फिरवली. पर्यायाच्या शोधात त्यांनी आम आदमी पक्षाला पसंती दिली. पंजाबात शिरोमणी अकाली दल पक्ष निष्प्रभ झाला होता आणि भाजपचे म्हणावे तेवढे ताकदवान अस्तित्व नव्हते. या पोकळीचा आम आदमी पक्षाला फायदा झाला. म्हणजे पक्षाला जे यश मिळाले ते बर्याचशा नकारात्मक पार्श्वभूमीवर, हे लक्षात घेतले पाहिजे. तथापि, आपल्यामुळेच हे यश आले, ही ‘ग’ ची बाधा केजरीवाल यांना झाल्याचे म्हटले जाते. त्यातून त्यांच्या अहंपणाच्या फुग्यात हवा भरली, असा सर्वसाधारण तर्क काढला, तर तो चुकीचा ठरणार नाही.राज्यसभेतील भाजपचे संख्याबळ १५३ झाले आहे. त्यामुळे राज्यसभेत भाजपला विधेयक मंजूर करण्यात अडचण येणार नाही. सत्तेची नशा डोक्यात गेली की, स्वतःच्याच पायावर कुर्हाड मारून घेण्याची अवदसा आठवते. ‘आप’मध्ये जे बंड झाले, त्याची पुनरावृत्ती होणार नाही, असे नाही. त्यामुळे स्वतःच्याच पायावर कुर्हाड मारून घेण्याचा उद्योग पुन्हा होणार नाही, असे नाही; पण ‘आप’मधील या घटनाक्रमाच्या निमित्ताने लोकशाहीतील एक उमलत्या स्वप्नाचे तुकडे व्हावेत हा दैवदुर्विलास आहे.*

# समाजाचा विचार करणारी म्हणजे नारायणी

## मनिषा संत यांचे उद्बोधन, विदर्भस्तरीय परिसंवादाचा समारोप

**विदर्भ प्रजासत्ताक**
**दि.२७अमरावती**

राष्ट्रसेविका समिती विदर्भ प्रांत आणि नरसम्मा कला, वाणिज्य आणि विज्ञान महाविद्यालय यांच्या संयुक्त विद्यमाने ‘नारी से नारायणी – विकसित भारत २०४७ : महिलांची भूमिका व योगदान’ या विषयावर रविवारी आयोजित एक दिवसीय प्रांतीय परिसंवादाच्या समारोपप्रसंगी त्या बोलत होत्या. यावेळी विश्वमांगल्य सभेच्या सभाचार्या रेणूकामाई प्रामुख्याने तर अध्यक्षस्थानी महाविद्यालयाचे प्राचार्य डॉ. राजेश चंदनपाट होते. राष्ट्रसेविका समितीच्या प्रांत बौद्धीक प्रमुख आरती तिवारी यांचीही विचारमंचावर उपस्थिती होती.मनिषा संत पुढे म्हणाल्या, स्त्री व पुरूष हे एकाच तत्त्वाचे दोन अंग आहे. हे दोनही अंग समानतेने कसे चालतील यावर आपल्याला काम करायाचे आहे. दोघांनी मिळून काम करण्याचा हा काळ आहे. तसेच महिलांना त्यांच्या आवडीचे काम करण्याचे स्वातंत्र्य दिल्यास विकसीत भारतासाठी ते उपयुक्त ठरणार आहे. रेणूकामाई आपल्या आशीर्वचनात म्हणाल्या, स्त्री ही शतरूपी आहे. ती वेगवेगळ्या रुपात समाजात कार्यरत आहे. भारताला विश्वगुरू पद प्राप्त करायचे असेल तर नारीला प्राधान्य देऊनच वाटचाल करावी लागणार आहे. तिची उपयोगीता विकसीत भारतासाठी मोलाची ठरणार असल्याचे त्यांनी सांगितले. वैयक्तीक गीत श्रावणी भडके यांनी सादर केले. संचालन यामीनी पांडे व उपस्थितांचे आभार राष्ट्रसेविका समितीच्या अमरावती नगर कार्यवाहीका गौरी लवाटे यांनी मानले. तत्पूर्वी कुटुंब ते राष्ट्रनिर्मिती, आधुनिक भारतातील महिला, समता ते सशक्तीकरण या विषयांवर चर्चासत्रे झाली. त्यानंतर विकसीत भारत २०४७ या विषयावर मुक्त संवाद झाला. राष्ट्रसेविका समितीच्या पश्चिम श्रेत्र बौद्धीक प्रमुख स्मिता पत्तरकीने, प्रज्ञा प्रवाह विदर्भ प्रांत प्रचार आयाम प्रमुख अंबरीश पुंडलिक, महिला समन्वय प्रांत संयोजिका मीरा कडबे यांनी त्यात सहभाग घेतला. या एक दिवसीय परिसंवादाला विदर्भातील प्रबुद्ध भगिनी मोठ्या संख्येने उपस्थित होत्या.



# ३० वर्षांची परंपरा असलेली अमरावती -गोंदिया बस सेवा अखेर पूर्ववत

## सामाजिक कार्यकर्ते प्रशांत कांबळे यांच्या लढ्याला यश

**विदर्भ प्रजासत्ताक**
**दि.२७गुरुकुंज मोझरी:**
गेल्या दोन आठवड्यांपासून अचानक बंद झालेली आणि प्रवाशांसाठी जीवनवाहिनी असलेली अमरावती–गोंदिया ही पहाटेची बस सेवा अखेर पुन्हा सुरू झाली आहे. स्थानिक नागरिक, सामाजिक कार्यकर्ते प्रशांत कांबळे आणि प्रवाशांनी केलेल्या सातत्यपूर्ण पाठपुराव्यामुळे प्रशासनाला नमते घ्यावे लागले. आज ही बस गुरुकुंज मोझरी येथे दाखल होताच प्रवाशांनी समाधान व्यक्त केले. अमरावती मुख्य बसस्थानकावरून दररोज पहाटे ५:१५ वाजता सुटणारी ही बस अमरावती, गुरुकुंज मोझरी, तळेगाव, कारंजा, नागपूर आणि गोंदिया या शहरांना जोडणारा महत्त्वाचा दुवा आहे. गेल्या ३० वर्षांपासून अविरत सुरू असलेली ही सेवा कोणतीही पूर्वसूचना न देता बंद करण्यात आली होती. यामुळे नोकरदार, विद्यार्थी आणि व्यवसायानिमित्त प्रवास करणाऱ्या हजारो लोकांचे हाल होत होते. भाविकांना आणि प्रवाशांना खासगी वाहनांचा आधार घेत जास्तीचे पैसे मोजावे लागत होते. ही सेवा बंद झाल्याने प्रवाशांमध्ये तीव्र संताप होता. सामाजिक कार्यकर्ते प्रशांत कांबळे यांच्या नेतृत्वाखाली किशोर खवले, जयंत निखाडे, जयंत तायवाडे, विनोद मेश्राम, रावसाहेब वानखेडे, अनिल मेश्राम आणि इतर ग्रामस्थांनी मोझरी बस डेपो व्यवस्थापक व भंडारा विभागीय वाहतूक नियंत्रण कार्यालयाकडे लेखी निवेदन देऊन आंदोलनाचा इशारा दिला होता. तर या प्रश्नाचे गांभीर्य ओळखून, भंडारा येथील विभागीय वाहतूक नियंत्रक निलेश बेलसरे यांनी सकारात्मक चर्चा करून येत्या दोन दिवसात सेवा सुरू करण्याचे आश्वासन दिले होते. त्यानुसार, प्रशासनाने तात्काळ दखल घेत ही बस सेवा पुन्हा रुळावर आणली आहे.

प्रशासनाने बस सेवा सुरू करून प्रवाशांना दिलासा दिला आहे, मात्र डेपोवरील स्वच्छतेच्या आणि सुरक्षेच्या प्रश्नांवर तातडीने सुधारणा न झाल्यास तीव्र आंदोलन छेडले जाईल.– **प्रशांत कांबळे**, सामाजिक कार्यकर्ते.–



# महावितरणच्या मान्सूनपूर्व देखभाल, दुरूस्तीचे पूर्वनियोजित कामे आता सकाळच्या सत्रात होणार

**विदर्भ प्रजासत्ताक**
**दि.२७अमरावती,**

उन्हाळ्यात विजेच्या वाढत्या मागणीच्या कालावधीत आणि पावसाळी परिस्थितीत वीजपुरवठा सुरळीत ठेवण्यासाठी महावितरणकडून वीज यंत्रणेशी संबंधित विविध देखभाल व दुरुस्तीचे पूर्वनियोजित कामे सध्या वेगात सुरु आहे. मात्र उन्हाचा तडाख्यात नागरिकांची गैरसोय टाळण्यासाठी देखभाल व दुरुस्तीचे पूर्वनियोजित कामे संबंधित दिवशी सकाळी ७ ते ११ वाजेदरम्यान करावेत असे निर्देश मुख्यालयाकडून क्षेत्रीय कार्यालयांना देण्यात आले.

महावितरणची प्रामुख्याने पावसाळ्यात वीजयंत्रणा सज्ज ठेवण्यासाठी तसेच वीजपुरवठा खंडित होणे व वीजसुरक्षेचे धोके टाळण्यासाठी वीज ग्राहकांना पूर्वसूचना देऊन देखभाल व दुरूस्तीचे कामे वीजराज्यभरात सध्या सुरु आहे. साधारणतः मे महिन्याच्या अखेरीस सर्व कामे पूर्णत्वास जातात. मात्र सद्यस्थितीत सकाळी १० ते दुपारी २ किंवा चार वाजेपर्यंत वीज पुरवठा बंद ठेवत देखभाल व दुरुस्तीचे कामे सुरु आहेत. नागरिकांसाठी ही गैरसोयीची वेळ टाळण्यासाठी यापुढे संबंधित दिवशी व वीजवाहिनीच्या पूर्वनियोजित देखभाल व दुरुस्तीचे काम यापुढे सकाळी ७ ते ११ वाजेदरम्यान करण्याचे निर्देश मुख्यालयाकडून देण्यात आले आहे. महावितरण च्या देखभाल दुरुस्तीचे पूर्वनियोजित कामे करताना सर्वप्रथम प्राधान्याने पर्यायी वीजपुरवठा उपलब्ध करून देण्याचे तसेच संबंधित वीजग्राहकांना नोंदणीकृत मोबाईल क्रमांकावर ‘एसएमएस’ द्वारे तसेच प्रसिद्धी माध्यमांद्वारे कळविण्याचे निर्देश देण्यात आले आहे.मान्सूनपूर्व देखभाल व दुरूस्तीच्या पूर्वनियोजित कामांमध्ये प्रामुख्याने वीजवाहिन्यांना स्पर्श करणाऱ्या झाडांच्या छोट्या फांद्या तोडणे, तूटलेले पीन व डिस्क इन्सूलेटर्स बदलणे, वितरण रोहित्रे, फिडर पिलर, रिंगमेन युनिटचे अर्थिंग तपासणे, ऑइल फिल्टरेशन व ऑइल टॉपिंग अप, रोहित्राच्या वितरण पेटीची दुरुस्ती, नादुरुस्त लाईटनिंग अरेस्टर बदलणे, वीजखांब व तारांचे मजबुतीकरण, तारांमधील झोल काढणे, गंजलेले किंवा खराब झालेले वीजखांब बदलणे, जुन्या वीजतारा बदलणे, फिडर पिलरची साफसफाई व आवश्यकतेनुसार इन्सूलेशन स्प्रे मारणे, उच्च व लघुदाब वीजतारांना गार्डिंग करणे यासह उपकेंद्रातील ब्रेकर्सची दुरुस्ती, बॅटरी चार्जिंग, पॉवर ट्रान्सफॉर्मरची देखभाल व ऑइल टॉपिंग अप अशा व इतर विविध दुरुस्ती कामांसह वीजपुरवठ्याच्या पर्यायी यंत्रणा सज्ज करणे आदी कामे करण्यात येत आहेत.




## जनतेच्या आशा-आकांक्षांचे खरे शिल्पकार

# विकास पुरुष आ. रवि राणा



सलग चौथ्यांदा बडनेरा मतदार संघाचे आमदार म्हणुन नेतृत्व करणारे , बडनेरा मतदार संघाच्या विकासाला गती देत त्याला नवसंजीवनी देणारे नेतृत्व म्हणजे आ. रवि राणा. त्यांच्या दूरदृष्टीमुळे आणि प्रभावी कार्यपद्धतीमुळे आज बडनेरा शहर तसेच ग्रामीण भागात विकासाची नवी पहाट उगवताना दिसत आहे. पुर्वी बडनेरा, भातकुली व अंजनगाव बारी हे विकासा पासुन वंचित होते, परंतु आ.रवि राणा यांच्या विकास कामांमुळे या ठिकाणचा चेहरा मोहरा बदलुन शहरासारख रुप प्राप्त झालेले आहे. रेल्वे वॅगन कोच कारखाना, विमानतळ, पायलट ट्रेनिंग सेंटर, मांस कम्युनिकेशन महाविद्यालय, फिशहरी केंद्र, कोडेश्वर सौदर्यीकरण विकास आराखडा, नवीन इलेक्ट्रीक बससाठी कोंडेश्वर रोडवरील चार्जिंग सेंटर, ग्रामीण पोलीस बांधवासाठी वसाहत, छत्री तलाव विकास सौदर्यीकरण यामुळे बडनेरा मतदार संघाची नवीन ओळख निर्माण झाली.शासकीय वैद्यकीय महाविद्यालय, कोडेश्वर येथे उभारण्यात येत असलेले भव्य बोधिभूमी सांस्कृतिक संकुल आणि ५१ फुट उंच भगवान गौतम बुद्धाची मूर्ती हे केवळ धार्मिक नव्हे तर सांस्कृतिक व पर्यटनदृष्ट्याही महत्त्वाचे प्रकल्प ठरत आहेत. यामुळे या परिसराला एक वेगळी ओळख मिळत आहे.हनुमान गढी येथे पर्यटन स्थळ घोषित करून १११ फूट उंच हनुमंत रायाची भव्य मूर्ती, तसेच भाविकांसाठी विश्रामगृह, ज्ञानकेंद्र यांसारख्या सुविधा उभारण्याचे काम सुरू आहे. यामुळे धार्मिक पर्यटनाला चालना मिळत असून स्थानिक अर्थव्यवस्थेलाही बळकटी मिळत आहे.भातकुली येथे नवीन तहसील इमारत, खोलापुरी गेट पोलीस स्टेशन, बडनेरा जुनिवस्तीतील सांस्कृतिक भवन आणि शादीखाना हॉल या कामांमुळे प्रशासकीय व सामाजिक सुविधा अधिक सक्षम झाल्या आहेत. तसेच ऋणमोचन, तपोनेश्वर, कोडेश्वर या पर्यटन स्थळांचा सर्वांगीण विकास करण्यात आला आहे.शहरातील तसेच ग्रामीण भागातील पायाभूत सुविधांमध्ये मोठ्या प्रमाणात सुधारणा करण्यात आली आहे. राजापेठ, नवाथे, गोपाल नगर, अकोली, भातकुली रोड येथील रेल्वे अंडरपास, तसेच राजापेठ, बडनेरा जुनिवस्ती आणि नवीवस्ती येथील रेल्वे उड्डाणपूल यामुळे वाहतुकीची मोठी समस्या सुटली आहे.पेढी आणि टाकळी कलान प्रकल्पांमुळे जलसंधारणाला चालना मिळाली आहे. संपूर्ण डीपी रोडचे बांधकाम, फ्रेजरपुरा बायपास ते बडनेरा जुनिवस्तीपर्यंत चारपदरी रस्ता व पथदिवे यामुळे शहराच्या विकासाला नवी गती मिळाली आहे.याशिवाय शहर व ग्रामीण भागात सभागृह, पांधण रस्ते, नाली काँक्रिटीकरण, बुद्धविहार, मंदिर सभागृह, तसेच विविध ठिकाणी सौंदर्यीकरण व भव्य प्रवेशद्वार उभारून परिसराचे रूपांतर करण्यात आले आहे.आ. रवि राणा हे केवळ विकासकामांपुरते मर्यादित नसून जनतेच्या प्रत्येक समस्येला प्रतिसाद देणारे, सर्वसामान्यांच्या सुख-दुःखात सहभागी होणारे लोकनेते आहेत. त्यांच्या नेतृत्वामुळे बडनेरा मतदार संघ आज प्रगतीच्या दिशेने वेगाने वाटचाल करत आहे.अशा या विकास पुरुषाला वाढदिवसानिमित्त हार्दिक शुभेच्छा! त्यांच्या पुढील वाटचालीसाठी उत्तम आरोग्य, दीर्घायुष्य आणि अधिक यश लाभो, हीच सदिच्छा. आ.रवि राणा यांच्या सारखा विकासाभिमुख आमदार बडनेरा मतदार संघाला मिळणे म्हणजे बडनेरा मतदार संघातील जनतेचे सौभाग्यच त्यांच्या नेतृत्वाखाली बडनेरा मतदार संघ आणखी प्रगत आणि आदर्श बनो, हीच अपेक्षा.



**अविनाश काळे**
**खाजगी सचिव**
**मा.आ.रविभाऊ राणा**
**मो.नं.९८३४२५८५०५**

# अमरावतीचे निवासी जिल्हाधिकारी संतोष काकडे यांना राज्यस्तरीय ‘कार्य गौरव’ पुरस्कार जाहीर



**विदर्भ प्रजासत्ताकदि.२७अमरावती:**
अमरावतीचे निवासी जिल्हाधिकारी संतोष काकडे यांना यंदाचा आध्यात्मिक व सामाजिक क्षेत्रातील प्रतिष्ठित 'राज्यस्तरीय कार्य गौरव' पुरस्कार जाहीर झाला आहे. अहिल्यानगर जिल्ह्यातील शेवगाव येथील गुरुदत्त सामाजिक, सांस्कृतिक, शैक्षणिक आणि कला व क्रीडा संस्थेच्या वतीने या पुरस्काराची घोषणा करण्यात आली आहे.दादाजी वंशपायन यांच्या जयंतीनिमित्त दरवर्षी विविध क्षेत्रात उल्लेखनीय कार्य करणाऱ्या व्यक्तींना या पुरस्काराने सन्मानित करण्यात येते. संस्थेचे अध्यक्ष अर्जुनराव फडके आणि सचिव फुलचंद्र रोकडे यांनी या निवडीबाबत अधिकृत माहिती दिली. ११ हजार रुपये रोख, स्मृतिचिन्ह आणि सन्मानपत्र असे या पुरस्काराचे स्वरूप आहे.काकडे यांनी आपल्या प्रशासकीय कारकिर्दीत सामाजिक बांधिलकी जपत राबवलेले विविध उपक्रम आणि त्यांच्या जनहितार्थ कार्याची दखल घेऊन ही निवड करण्यात आली आहे.हा पुरस्कार वितरण सोहळा शुक्रवार, १ मे रोजी वैश्यपायनगर येथील सभागृहात आयोजित करण्यात आला आहे. या सोहळ्याला विविध क्षेत्रातील मान्यवर उपस्थित राहणार आहेत. संतोष काकडे यांना हा सन्मान मिळाल्याबद्दल जिल्हा प्रशासन व सामाजिक स्तरातून त्यांचे अभिनंदन होत आहे.–

# फळबाजारात देवगड हापूसचा राजासारखा थाट

## केशर, दशहरीसह विविध जातींची मांदियाळी




**ग्राहकांचा उत्साह कायम**

महागाई आणि उष्णतेची लाट असतानाही आंब्याप्रती असलेले आकर्षण कमी झालेले नाही. सुटीचा आनंद घेण्यासाठी आणि उन्हाळ्याची गोडी वाढवण्यासाठी ग्राहकांनी फळबाजारात खरेदीसाठी रांगा लावल्या आहेत. विविध जातींचे आंबे उपलब्ध असल्याने ग्राहक आपल्या खिशाला परवडेल अशा आंब्याची निवड करत आहेत.

वाढत्या तापमानाचा परिणाम केवळ माणसांवरच नाही, तर फळांच्या राजावरही झाला आहे. कडक उन्हामुळे बागांमधील आंब्याला फटका बसला असून, तुलनेने बाजारातील आवक मंदावली आहे. आवक कमी असल्याने आणि मागणी जास्त असल्याने दरांमध्ये काही प्रमाणात वाढ झाली आहे.

**– प्रमोद काळे , फळ विक्रेता,**

**विदर्भ प्रजासत्ताक**
**दि.२७अमरावती**
उन्हाचा तडाखा वाढत असतानाच फळप्रेमींसाठी एक गोड बातमी समोर आली आहे. फळबाजारात कोकणचा राजा मानल्या जाणाऱ्या ‘देवगड हापूस’चे दणक्यात आगमन झाले आहे. हापूससोबतच केशर, दशहरी आणि बैगनपल्ली यांसारख्या इतर जातींनीही बाजारपेठ सजली असून, फळबाजारात सध्या आंब्यांचा मधुर सुगंध दरवळत आहे. यंदा हंगामाच्या सुरवातीलाच देवगड हापूसने चांगलाच भाव खाल्ला आहे. उत्कृष्ट चव आणि आकर्षक रंगासाठी प्रसिद्ध असलेला हापूस सध्या १२०० ते १४०० रुपये डझन दराने विकला जात आहे. दराचा आकडा मोठा असला, तरी हापूसची चव चाखण्यासाठी ग्राहकांनी बाजारात मोठी गर्दी केली आहे. हापूसशिवाय इतर राज्यांतील आणि राज्यातील प्रसिद्ध आंब्यांनीही दुकाने सजली आहेत. केशर २०० रुपये प्रति किलो, लंगडा २००, दशहरी १५० रुपये, बैगनपल्ली ८० ते १०० रुपये प्रति किलो दराने विकला जात आहे.

आपल्या परिसरातील बातम्या, लेख, यशोगाथा, जाहिरात तुम्ही आमच्या मेल वर पाठवू शकता prajasattaknews.24gmail.com, arunjoshi.ucn@gmail.com या मेल वर पाठवा आमचा अंक तुम्हाला अगदी मोफत मिळवायचा असेल तर आम्हाला मेल करा तुमचा व्हाट्सअप नंबर

सांध्य दैनिक विदर्भ प्रजासत्ताक RNI NO-M-HM-R 2023/84526-प्रिंट / **PDF** / वेब - पोर्टल /ई - पेपर

# मेळघाटात कुपोषणाचे सावट कायम; वर्षभरात ९२ बालकांसह ५ मातांचा मृत्यू

**विदर्भ प्रजासत्ताक दि.२७अमरावती :**

आदिवासी बहुल म्हणून ओळखल्या जाणाऱ्या मेळघाट परिसरात कुपोषणाचा प्रश्न अद्यापही गंभीर स्वरूपात कायम असल्याचे चित्र समोर आले आहे. एप्रिल २०२५ ते मार्च २०२६ या कालावधीत तब्बल ९२ बालकांचा मृत्यू झाल्याची नोंद आरोग्य विभागाकडे असून, याच काळात ५ मातांनीही जीव गमावला आहे. त्यामुळे मेळघाटातील आरोग्य व्यवस्थेवर पुन्हा एकदा प्रश्नचिन्ह निर्माण झाले आहे.चिखलदरा व धारणी या डोंगराळ आणि दुर्गम तालुक्यांचा समावेश असलेल्या मेळघाटात आरोग्य सुविधांचा अभाव ही मोठी समस्या ठरत आहे. दुर्गम वाड्या-पाड्यांपर्यंत वेळेवर आरोग्य सेवा पोहोचत नसल्याने बालमृत्यू आणि मातामृत्यूंचे प्रमाण वाढत असल्याचे स्पष्ट होत आहे. विशेषतः नवजात व एका वर्षाखालील बालकांमध्ये मृत्यूचे प्रमाण अधिक चिंताजनक आहे.कुपोषण, अपुरी वैद्यकीय सेवा, वेळेवर उपचारांचा अभाव आणि वाहतुकीची अडचण ही या मृत्यूमागील प्रमुख कारणे असल्याचे समोर आले आहे. आरोग्य विभागाकडून विविध योजना राबविल्या जात असल्या,



तरी त्यांच्या प्रभावी अंमलबजावणीअभावी परिस्थितीत अपेक्षित सुधारणा होत नसल्याची तक्रार स्थानिकांकडून केली जात आहे.दरम्यान, या गंभीर प्रश्नावर यापूर्वी मुंबई उच्च न्यायालयानेही प्रशासनावर ताशेरे ओढले होते. तरीदेखील परिस्थितीत फारसा बदल न झाल्याने मेळघाटातील कुपोषणाचा कलंक केव्हा पुसला जाणार, असा सवाल आता पुन्हा उपस्थित होत आहे.

### रुग्णालय कामाला गती

राज्य शासनाने धारणी येथील १०० खाटाच्या उपजिल्हा रुग्णालयाचे श्रेणीवर्धनकरुन येथे ३०० खाटांचे सामान्य रुग्णालयाला मान्यता दिली आहे. त्याच बरोबर चुरणी आणि चिखलदरा येथे प्रत्येकी ५० खाटांचे उपजिल्हा रुग्णालय होणार आहे. त्यामुळे या रुग्णालयाच्या कामांना गती देण्यात आली असून ३०० खाटांच्या रुग्णालयासाठी जागा निश्चितीचा प्रश्नदेखील अंतिम टप्प्यात असल्याचे सांगण्यात आले.

# ‘ॲण्ड्रॉइड १२’ सक्ती; शिक्षक आले अडचणीत



## ॲप-आधारित जनगणना; मोबाईल खरेदीचा बोजा, शिक्षकांवर वाढला ताण

**विदर्भ प्रजासत्ताक दि.२७अमरावती :**

आगामी जनगणना प्रक्रियेच्या पार्श्वभूमीवर अमरावती जिल्ह्यात शिक्षकांचे प्रशिक्षण वेगाने सुरू असून, यासाठी वापरल्या जाणाऱ्या मोबाईल ॲपसाठी किमान ॲँड्रॉइड १२ ही अट अनिवार्य करण्यात आली आहे. त्यामुळे अनेक शिक्षकांचे विद्यमान मोबाईल निष्प्रभठरत असून, नव्याने मोबाईल खरेदी करण्याची वेळ त्यांच्यावर आली आहे.

'बीवायओडी' धोरणांतर्गत शासनाकडून कोणतीही साधनसामग्री न देता शिक्षकांनी स्वतःच्या मोबाईलवरच जनगणनेचे काम करावे, अशी अपेक्षा ठेवण्यात आली आहे. यामुळे शासनाची जबाबदारी शिक्षकांवर ढकलली जात असल्याची भावना व्यक्त होत आहे.अमरावती जिल्ह्यासह तालुक्यात सुरू असलेल्या प्रशिक्षणात जनगणनेची संपूर्ण प्रक्रिया शिक्षकांना समजावून सांगितली जात आहे. प्रत्येक शिक्षकाला ठरावीक क्षेत्र देण्यात येणार असून, उन्हाळ्याच्या सुटीत गावोगावी घरोघरी जाऊन माहिति संकलन करावे लागणार आहे.ही प्रक्रिया १५ मे ते १६ जूनदरम्यान राबवली जाणार आहे. कुटुंबातीलसदस्यांची संख्या, वय, लिंग, शिक्षण, व्यवसाय, स्थलांतर, निवास स्थिती यासह विविध माहिती मोबाईल ॲपमध्ये नोंदवावी लागणार आहे. तसेच प्रत्येक घराचे जीपीएस लोकेशन, घराचा प्रकार, पाणी, वीज, शौचालय यांसारख्या मूलभूत सुविधांची माहितीही ॲपवर अपलोड करावी लागणार आहे. काही ठिकाणी घरांचे फोटो अपलोड करण्याच्या सूचनाही देण्यात आल्याची माहिती शिक्षकांनी दिली.

या संपूर्ण प्रक्रियेसाठी इंटरनेट कनेक्टिव्हिटी, मोबाईलची क्षमता आणि अद्ययावत सॉफ्टवेअर आवश्यक असल्याने शिक्षकांवर अतिरिक्त ताण निर्माण झाला आहे.

### प्रशिक्षणार्थात नाराजी वाढली

जनगणना हे शासनाचे काम असताना खर्च मात्र शिक्षकांनी का करावा? असा संतप्त सवाल शिक्षकांकडून उपस्थित केला जात आहे. ग्रामीण भागातील शिक्षकांना याचा अधिक फटका बसत असून, अद्ययावत मोबाईल नसल्याने आर्थिक ताण वाढला आहे. आवश्यक साधनसामग्री न देता सर्व जबाबदारी शिक्षकांवर टाकली जात असल्याने नाराजी वाढत असल्याचे प्रशिक्षणातील शिक्षकांनी सांगितले.

# प्रहार पक्ष शिवसेनेत विलीन होणार?

## आमदारकीसाठी अट ठेवल्याची चर्चा

**विदर्भ प्रजासत्ताक दि.२७ अमरावती :**

राज्यातील आगामी विधान परिषद निवडणुकीच्या पार्श्वभूमीवर राजकीय हालचालींना वेग आला असून, महायुतीतील घटक पक्षांमध्ये नवे समीकरण तयार होण्याची चिन्हे दिसत आहेत. उपमुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांच्या नेतृत्वाखालील शिवसेना (शिंदे गट) सध्या रणनीती आखत असून, प्रहार जनशक्ती पक्षाचे अध्यक्ष बच्चू कडू यांच्या राजकीय पुनर्वसनाबाबत चर्चा रंगल्या आहेत.सूत्रांच्या माहितीनुसार, बच्चू कडू यांना विधान परिषदेवर पाठविण्यासाठी



शिवसेना तयार असल्याचे सांगितले जात आहे. मात्र त्यासाठी एक महत्त्वाची अट पुढे ठेवण्यात आली असून, प्रहार जनशक्ती पक्षाचा शिवसेनेत विलय करावा, अशी अट असल्याची चर्चा राजकीय वर्तुळात सुरू आहे.या अटीमुळे बच्चू कडू यांच्यासमोर पेच निर्माण झाला असून, स्वतंत्र ओळख जपायची की आमदारकीची संधी स्वीकारायची, असा द्वंद्व निर्माण झाल्याचे मानले जात आहे. प्रहार पक्ष हा विदर्भातील प्रभावी दबाव गट मानला जातो, त्यामुळे या संभाव्य विलयाचे दूरगामी परिणाम होऊ शकतात.दरम्यान, या घडामोडींमुळे महायुतीतील अंतर्गत समीकरणांवरही परिणाम होण्याची शक्यता व्यक्त केली जात आहे. विधान परिषद निवडणुकीच्या तोंडावर घेतले जाणारे निर्णय राज्याच्या राजकारणाला नवे वळण देऊ शकतात, अशी चर्चा राजकीय वर्तुळात रंगू लागली आहे.

# चीरोडी गावात तीव्र पाणीटंचाई

## दूषित पाण्यामुळे आरोग्य धोक्यात, ग्रामस्थांचा आंदोलनाचा इशारा

**विदर्भ प्रजासत्ताक दि.२७चांदुर रेल्वे**

जिल्ह्यातील चांदूर रेल्वे तालुक्यातील चीरोडी गावात भीषण पाणीटंचाई निर्माण झाली असून नागरिकांना पाण्यासाठी वणवण भटकंती करावी लागत आहे. नगर परिषदेकडून पुरवले जाणारे पाणी गढूळ व अशुद्ध असल्याने गावकऱ्यांच्या आरोग्यावर गंभीर परिणाम होत आहेत. दूषित पाण्यामुळे विविध आजारांचा धोका वाढला असून लहान मुले व वृद्ध सर्वाधिक त्रस्त आहेत. विशेषतः महिला वर्गाला दूरवरून पाणी आणावे लागत असल्याने त्यांची मोठी गैरसोय होत आहे. अनेक वेळा तक्रारी करूनही प्रशासनाकडून ठोस उपाययोजना करण्यात आलेली नाही, असा ग्रामस्थांचा आरोप आहे. परिस्थिती तात्काळ सुधारली नाही तर आंदोलन छेडण्याचा इशारा संतप्त नागरिकांनी दिला आहे.

# महाव्यवस्थापक जगताप यांच्या अमरावती दौऱ्याने कर्मचाऱ्यांत उत्साह

## प्रत्यक्ष पाहणीने दिली नवी ऊर्जा

**विदर्भ प्रजासत्ताक दि.२७अमरावती**

महाव्यवस्थापक (यंत्र अभियंता) जगताप यांनी अलीकडेच अमरावती विभागाचा दौरा करून कामकाजाची सखोल पाहणी केली. आपल्या व्यस्त वेळापत्रकातून वेळ काढून त्यांनी विभागातील विविध बाबींचा आढावा घेतला, कर्मचाऱ्यांच्या अडचणी समजून घेतल्या आणि मार्गदर्शन केले. या दौऱ्यामुळे कर्मचाऱ्यांमध्ये नवचैतन्य निर्माण झाले असून, कामकाज अधिक सक्षमपणे करण्याची प्रेरणा मिळाल्याची भावना व्यक्त होत



आहे.मान्यता प्राप्त कामगार संघटनेचे विभागीय सचिव यांच्या वतीने संपूर्ण विभागाच्या कर्मचाऱ्यांनी जगताप साहेबांचे मनःपूर्वक आभार मानले. त्यांच्या भेटीदरम्यान त्यांनी प्रत्यक्ष कार्यस्थळी जाऊन निरीक्षण केले, अगदी गाड्यांच्या खाली उतरून तांत्रिक बाबींची तपासणी केल्याचा अनुभव अनेक कर्मचाऱ्यांसाठी प्रथमच होता. यामुळे अधिकाऱ्यांचा कामाप्रती असलेला समर्पणभाव अधोरेखित झाला.गेल्या २० वर्षांच्या सेवेत असा प्रत्यक्ष आणि सखोल सहभाग क्वचितच पाहायला मिळाला, अशी प्रतिक्रिया काही कर्मचाऱ्यांनी व्यक्त केली. त्यांच्या अनुभवपूर्ण सूचनांमुळे विभागाच्या प्रगतीला नवी दिशा मिळेल, असा विश्वास व्यक्त करण्यात आला.या दौऱ्यामुळे अधिकारी आणि कर्मचारी यांच्यातील संवाद अधिक मजबूत झाला असून, समस्यांचे निराकरण करण्यासाठी सकारात्मक वातावरण निर्माण झाले आहे. भविष्यातही असेच सहकार्य आणि मार्गदर्शन लाभावे, अशी अपेक्षा अमरावती विभागाचे विभागीय सचिव मोहित देशमुख यांनी व्यक्त करीत जगताप साहेबांचे आभार मानलेत.

# युवकांच्या सर्वांगीण विकासासाठी ‘करिअर कट्टा’

## विद्यापीठात एकदिवसीय विभागीय कार्यशाळा उत्साहात

**विदर्भ प्रजासत्ताक दि.२७अमरावती**

महाराष्ट्र राज्य उच्च व तंत्रशिक्षण विभाग आणि महाराष्ट्र माहिती तंत्रज्ञान सहायता केंद्राच्या संयुक्त विद्यमाने राज्यातील प्रत्येक महाविद्यालयात राबविण्यात येत असलेल्या ‘करिअर कट्टा’ या उपक्रमातील नावीन्यपूर्ण संकल्पनांच्या वृद्धीसंदर्भात जागृती निर्माण करण्याच्या उद्देशाने अमरावती विभागाची एक दिवसीय विभागीय कार्यशाळा झाली. विद्यापीठाच्या भारतरत्न डॉ. बाबासाहेब आंबेडकर दृकश्राव्य सभागृहात या कार्यशाळेचे आयोजन करण्यात आले होते. महाराष्ट्र माहिती तंत्रज्ञान सहायता केंद्राचे अध्यक्ष यशवंत शितोळे यांच्या अध्यक्षतेखाली संत



गाडगेबाबा अमरावती विद्यापीठाचे कुलगुरू डॉ. मिलिंद बारहाते यांच्या हस्ते कार्यशाळेचे उद्घाटन करण्यात आले. व्यासपीठावर विद्यार्थी विकास विभागाचे संचालक डॉ. राजीव बोरकर, अमरावती विभागीय प्राचार्य प्रवर्तक धनंजय तळवणकर, विभागीय समन्वयक डॉ. दिनेश खेडकर तसेच डॉ. रंजना जीवने उपस्थित होते. संचालन अमरावती जिल्हा समन्वयक डॉ. रेखा मगीरवार यांनी केले. आभार विभागीय सहसमन्वयक डॉ. रंजना जिवने यांनी मानले. याप्रसंगी जिल्हा नियोजन समितीचे पदाधिकारी उपस्थित होते. १२५ हून अधिक महाविद्यालयांचे प्राचार्य तसेच करिअर कट्टा समन्वयक यांच्या उपस्थितीमुळे कार्यशाळेच्या यशस्वीतेत भर पडली.


# संत गुलाबबाबा यांच्याविषयी आक्षेपार्ह वक्तव्य

# श्याम मानव यांच्यावर कारवाई करा

## श्रीसंत गुलाबबाबा यांच्या भक्त मंडळांची मागणी

**विदर्भ प्रजासत्ताक दि.२७ अंजनगाव सुर्जी**

श्री क्षेत्र टाकरखेडा मोरे येथील ब्रह्मलीन झालेल्या सिद्धेश्वर श्री संत गुलाबबाबा



यांच्या विषयी शयाम मानव यांनी आक्षेपार्ह वक्तव्य केल्या प्रकरणी श्री संत गुलाबबाबा भक्त मंडळानी पोलिस स्टेशन येथे श्री श्याम मानव यांच्यावर कायदेशीर कारवाई करण्यात यावी या मागणीचे निवेदन दिले.

संत गुलाबबाबा यांच्यावर अपमानास्पद, आक्षेपार्ह भाष्य शयाम मानव यांनी व्याख्यानातून केले होते. यामुळे लाखो भक्तांच्या धार्मिक भावना दुखावल्या गेल्या आहेत. श्री संत गुलाबबाबा हे महाराष्ट्र सह, छत्तीसगड, आंध्र प्रदेश, गुजरात, आणि मध्यप्रदेश येथील लाखो भक्तांचे श्रद्धास्थान आहेत. त्यांच्या कार्यकाळात त्यांनी सामाजिक, शैक्षणिक, सांस्कृतिक, धार्मिकक्षेत्रात मोलाचे योगदान दिले आहे. आजही टाकरखेडा मोरे येथील त्यांच्या समाधी स्थळी वर्षभर अन्नदान, धर्मार्थ दवाखाना, गोरक्षण तसेच विविध सामाजिक उपक्रम राबविले जातात. निवेदन देताना तालुक्यातील श्री संत गुलाबबाबायांचेहजारो भक्त मंडळी उपस्थित होते.

सभेचे अवलोकन करणार अंनिसचे शयाम मानव यांच्या नाशिक व अकोला येथे झालेल्या सभेचे अवलोकन करून पुढील कार्यवाही करण्यात येईल. श्री संत गुलाब बाबा भक्त मंडळीचे निवेदन डिजी नाशिक वजिल्हा पोलीस अधिक्षक अमरावती ग्रामीण यांना पाठविले आहे.

**सुरज बोंडे,** पोलीस निरीक्षक, अंजनगाव सुर्जी.

### गुन्हा दाखल करावा

२६ वर्षापूर्वी समाधिस्त झालेले सिद्धेश्वरसंत श्री गुलाब बाबा या संतांबाबत अश्लील व्यक्तव्य तथ्य नसतांना बोलू नये. त्यांनी अंधश्रद्धेवर बोलावं. आमच्या गुरूंनी नेहमी अंधश्रद्धेचा विरोधच केला. आम्ही त्यांना माफ करणार नाही त्यांचेवर कायदेशीर गुन्हा दाखल करण्यात यावा अशी मागणी केली आहे.

**ॲड. गोपाल उमक** अध्यक्ष, टाकरखेडा मोरे.

# खतविक्रेत्यांचा ‘बंद’ शेतकरी कोंडीत

**विदर्भ प्रजासत्ताक दि.२७अमरावती-**



राज्यात एकीकडे रासायनिक खतांचा तुटवडा निर्माण झाल्याने शेतकरी चिंतेत असतानाच, आता खतविक्रेत्यांनी आज सोमवारपासून (ता. २७) बेमुदत बंद पुकारल्याने खळबळ उडाली आहे. खत कंपन्यांकडून होणारी लिंकिंगची सक्ती आणि प्रशासकीय जाचक अटींविरुद्ध महाराष्ट्र फर्टिलायझर्स, पेस्टिसाइडस, सीड्स डिलर्स असोसिएशनने (माफदा) पुकारलेल्या या आंदोलनामुळे आगामी खरीप हंगामाच्या पूर्वतयारीला मोठा फटका बसण्याची शक्यता निर्माण झाली आहे. खतटंचाई आणि त्यातच विक्री केंद्रांना पडलेले टाळे यामुळे शेतकरी आता कोंडीत सापडला आहे. गेल्या काही दिवसांपासून बाजारपेठेत युरिया आणि डीएपी खतांचा तुटवडा जाणवत आहे. अशातच खत कंपन्या खतांसोबत इतर अनावश्यक उत्पादने घेण्याची सक्ती (लिंकिंग) विक्रेत्यांवर करत आहेत. याचा थेट परिणाम शेतकऱ्यांच्या खिशावर होत आहे.

# दोन घोट पाण्याचे जीव वाचवण्याचे!

# अबोल पक्ष्यांसाठी जलपात्र, प्रवाशांसाठी पाणपोई



**विदर्भ प्रजासत्ताक दि.२७अचलपूर** वाढते तापमान व वृक्षतोडीमुळे त्रस्त झालेल्या अबोल पक्ष्यांसाठी आणि प्रवासी नागरिकांसाठी परतवाड्यात सामाजिक उपक्रम राबविण्यात आला. आदिवासी पर्यावरण संघटन, युवा सेना (शिंदे गट) आदी संस्थांच्या संयुक्त विद्यमाने बसस्थानक परिसरात शीतल अमृत जल पाणपोईचे उद्घाटन करण्यात आले.यावेळी कु. अधिरा सुशांत काळे हिने वाढदिवसानिमित्त पक्ष्यांसाठी ५० मातीचे जलपात्र भेट देत पर्यावरणप्रेमाचा संदेश दिला. या जलपात्रांचे वितरण करून पाणी वाचवा - पक्षी वाचवा अशी जनजागृती करण्यात आली.तत्पश्चात ऑक्सिजन पार्क येथे जनजागृती अभियान राबविण्यात आले. नगराध्यक्ष रुपाली अभय माथने, जीवन वानखडे, सचिन वानखडे, सुशांत काळे, अनिल पिंपळे, योगेश खानझोडे, प्रीतेश अवघड यांच्यासह मान्यवर उपस्थित होते. कवी राजा धर्माधिकारी यांनी कवितेद्वारे संदेश दिला.या उपक्रमातून पाणपोई व जलपात्र यांच्या माध्यमातून समाजासमोर मानवतेचा आदर्श उभा करण्यात आला.

# सोमेश्वर पुसतकर सांस्कृतिक महोत्सव

## ‘हे सुरांनो चंद्र व्हा...’ चे गुरुवारी आयोजन

### अनिरुद्ध जोशी ,मधुरा कुंभार, मंगेश बोरगावकर व राधिका भिडे यांची मैफिल

**विदर्भ प्रजासत्ताक दि.२७अमरावती**

सोमेश्वर पुसतकर सांस्कृतिक महोत्सवात येत्या गुरुवारी दिनांक ३० एप्रिल रोजी महाराष्ट्रातील आघाडीचे प्रतिभावंत गायक अनिरुद्ध जोशी ,मधुरा कुंभार , मंगेश बोरगावकर व राधिका भिडे यांचा 'हे सुरांनो चंद्र व्हा...' ही मराठी व हिंदी गीतांच्या सादरीकरणाची मैफिल आयोजित करण्यात आली आहे . संत ज्ञानेश्वर सांस्कृतिक सभागृहात सायंकाळी ६. ३० वाजता आयोजित हा कार्यक्रम नि:शुल्क आहे.

सोमेश्वर पुसतकर यांच्या स्मृतिप्रीत्यर्थ दरवर्षी आझाद हिंद गणेशत्सव मंडळ , आम्ही सारे फाऊंडेशन आणि सोमेश्वर पुसतकर मित्र परिवाराच्या वतीने दरवर्षी सांस्कृतिक महोत्सवाचे आयोजन केले जाते . या महोत्सवाला अमरावतीकरांचा भरघोस प्रतिसाद लाभतो. मागील वर्षी आयोजित महोत्सवाला अमावतीकरांनी रेकॉर्डब्रेक गर्दी केली होती. यावर्षीच्या ज्या चार गायकांचा कार्यक्रम आयोजित केला आहे . ते चारही महाराष्ट्रातील नामवंत व गाजलेले कलाकार आहेत .

#### मधुरा कुंभार

'५७ व्या महाराष्ट्र राज्य चित्रपट' व ‘स्त्री शक्ती सन्मान’ या पुरस्कारांच्या विजेत्या असून ‘सारेगामापा, सिंगिंग सुपरस्टार’ आणि ‘सुर नवा ध्यास नवा’ या लोकप्रिय कार्यक्रमांतून त्यांनी आपल्या प्रभावी, भावपूर्ण गायकीची छाप पाडत संपूर्ण महाराष्ट्रात भक्कम नावलौकिक मिळवला आहे. त्यांच्या सातत्यपूर्ण साधना, व्यासंगी वृत्ती आणि दर्जेदार सादरीकरणामुळे त्या संगीतविश्वात एक सक्षम व आश्वासक आवाज म्हणून उदयास आल्या आहेत.

#### मंगेश बोरगावकर

मंगेश बोरगावकर हे मराठी संगीत आणि चित्रपटसृष्टीतील एक अत्यंत लोकप्रिय आणि हरहुन्नरी पार्श्वगायक आहेत.२००६ मध्ये झी मराठी वाहिनीवर सुरू झालेल्या 'सा रे ग म प' या लोकप्रिय गायन रिलिटी शोच्या पहिल्या पर्वाचे ते उपविजेते ठरले होते. याच कार्यक्रमाने त्यांना महाराष्ट्राच्या घराघरांत पोहोचवले आणि त्यांच्या व्यावसायिक सांगीतिक




प्रवासाची सुरुवात झाली.त्यांनी गायलेली 'नाही कळले कधी', 'तुझ्याविना' ही गाणी अत्यंत लोकप्रिय आहेत. तसेच त्यांचा 'दिवाना झालो तुझा' हा संगीत अल्बम तरुण वर्गात प्रचंड गाजला होता.

मंगेश बोरगावकर हे मराठी संगीत आणि चित्रपटसृष्टीतील एक अत्यंत लोकप्रिय आणि हरहुन्नरी पार्श्वगायक आहेत.२००६ मध्ये झी मराठी वाहिनीवर सुरू झालेल्या 'सा रे ग म प' या लोकप्रिय गायन रिलिटी शोच्या पहिल्या पर्वाचे ते उपविजेते ठरले होते. याच कार्यक्रमाने त्यांना महाराष्ट्राच्या घराघरांत पोहोचवले आणि त्यांच्या व्यावसायिक सांगीतिक प्रवासाची सुरुवात झाली.

त्यांनी गायलेली 'नाही कळले कधी', 'तुझ्याविना' ही गाणी अत्यंत लोकप्रिय आहेत. तसेच त्यांचा 'दिवाना झालो तुझा' हा संगीत अल्बम तरुण वर्गात प्रचंड गाजला होता.

#### राधिका भिडे

राधिका प्रामुख्याने 'आय पॉपस्टार' या हिंदी म्युझिक रियालिटी शोमुळे प्रकाशझोतात आली. या स्पर्धेत तिने केवळ गायिका म्हणून नव्हे, तर स्वतः गाणी लिहून आणि ती कंपोज करून सादर केली.

तिचे 'मन धावतंया' हे गाणे सोशल मीडियावर प्रचंड व्हायरल झाले. या गाण्याने तिला घराघरात पोहोचवले.तिच्या एका संस्कृत लघुपटासाठी तिला आंतरराष्ट्रीय स्तरावर द्वितीय पुरस्कार मिळाला आहे.तिने 'दे धक्का २' सारख्या चित्रपटांसाठी सहाय्यक संगीत दिग्दर्शिका म्हणूनही काम केले आहे.

राधिका प्रामुख्याने 'आय पॉपस्टार' या हिंदी म्युझिक रियालिटी शोमुळे प्रकाशझोतात आली. या स्पर्धेत तिने केवळ गायिका म्हणून नव्हे, तर स्वतः गाणी लिहून आणि ती कंपोज करून सादर केली. तिचे 'मन धावतंया' हे गाणे सोशल मीडियावर प्रचंड व्हायरल झाले. या गाण्याने तिला घराघरात पोहोचवले.तिच्या एका संस्कृत लघुपटासाठी तिला आंतरराष्ट्रीय स्तरावर द्वितीय पुरस्कार मिळाला आहे.तिने 'दे धक्का २' सारख्या चित्रपटांसाठी सहाय्यक संगीत दिग्दर्शिका म्हणूनही काम केले आहे.

#### अनिरुद्ध जोशी

सा रे ग म प – सुर नवा ध्यास नवा या प्रतिष्ठित मंचावर अनिरुद्ध जोशी यांनी आपल्या सुरेल, भावस्पर्शी आणि दमदार आवाजाच्या जोरावर प्रेक्षकांची मनं जिंकली. सा रे ग म प मध्ये फायनलिस्ट म्हणून तर सुर नवा ध्यास नवा या स्पर्धेत त्यांनी विजेतेपद पटकावत आपल्या प्रतिभेचा ठसा उमटवला. विविध गायनशैलींवर प्रभुत्व, अथक मेहनत आणि संगीतावरील निष्ठा यांच्या बळावर त्यांनी महाराष्ट्राचा महागायक ही मानाची ओळख निर्माण केली.–

# हिंदू नाव धारण करून मुलींना फसवणारे रॅकेट अमरावतीत सक्रिय

## लैंगिक शोषणाचे प्रकार, हॉकर्सची मस्ती उतरवण्याची गरज– शिवराय कुलकर्णी

**विदर्भ प्रजासत्ताक दि.२७अमरावती**

अमरावती शहरात रस्त्यांवर चायनीजच्या गाड्या लावणाऱ्या मुस्लिम हॉकर्सनी हिंदू नाव धारण करून हिंदू मुलींना प्रेमाच्या जाळ्यात फसवून त्यांचे सातत्याने लैंगिक शोषण केले असल्याची घटना उघडकीस आली आहे. एका हिंदू युवतीच्या तक्रारीवरून नांदगाव पेठ पोलिसांनी या प्रकरणी बलात्काराचा गुन्हा दाखल करून दोन मुस्लिम आरोपींना अटक केली आहे.हे प्रकरण एका युवतीला फसवायचे नसून यातील मुख्य आरोपी रियाजुद्दीन फैयाजुद्दीन पठाण याने याच पद्धतीने अनेक युवतींना फसवून त्यांचे लैंगिक शोषण केले असल्याचा खळबळ जनक आरोप पीडित युवतीने केला आहे. रियाजउद्दीन ची चायनीज गाडी पंचवटी चौकात इझएव कॉलेज जवळ उभी असते. हिंदू नाव धारण करून आर्थिक दृष्ट्या कमकुवत असलेल्या, लग्न ठरत नसलेल्या किंवा कुठल्यातरी समस्येने ग्रस्त असलेल्या तरुणींना सुरुवातीला आधार देण्याचे नाटक करायचे आणि नंतर प्रेमाचे नाटक करून त्यांचे लैंगिक शोषण करण्याचा धंदा रियाज उद्दीनने केला आहे. हे करण्यासाठी त्यांनी हिंदू नाव धारण केले होते. रियाझउद्दीन



स्वतःचे नाव राजू असे सांगायचा. शिवाय आपल्याला बंगालची जादू येते आणि त्या जादूच्या आधारे तुला समस्येतून मुक्त करून देईल अशी भोंदूगिरी देखील तो करायचा. समस्याग्रस्त युवतींना अज्ञात स्थळी नेऊन उपचारांच्या नावाखाली हळूहळू त्यांच्या प्रायव्हेट पार्ट्सला अत्तर लावणे आणि असे करता करता त्या युवतींवर शारीरिक ताबा मिळवायचा असे भयंकर प्रकार या रियाजुद्दीन केले आहे.अमरावती पोलिसांनी रियाजुद्दीन फैयाजुद्दीन पठाण याच्यासह आणखी एकाला अटक केली आहे. पण हे प्रकरण केवळ बलात्काराचे नसून हे मोठे रॅकेट असल्याचा संशय पिडीतेच्या कथनावरून निर्माण झाला आहे. अमरावती शहरातील सर्व प्रमुख रस्त्यांवर असलेली हॉकर्सची दादागिरी संपूर्ण ची गरज देखील या निमित्ताने निर्माण झाली आहे. परतवाड्याचे प्रकरण जेवढे गंभीर आहे तेवढेच किंवा त्याहूनही जास्त गंभीर प्रकरण रियाजुद्दीनचे आहे.

ज्या ज्या युवती याच्या जाळ्यात फसल्या त्यांचे नग्न अवस्थेतील फोटो काढून त्यांना नेहमीसाठी ब्लॅकमेल करण्याची पद्धत रियाजउद्दीन वापरत होता. अमरावती पोलिसांनी याप्रकरणी केवळ एक बलात्काराचे प्रकरण न पाहता यामागे सक्रिय असलेले रियाजउद्दीन व त्याच्या साथीदारांचे रॅकेट शोधून काढले पाहिजे,लव जिहादचा हा नवा प्रकार आहे. हिंदू युवतींनी हॉकर्सची खात्री करूनच त्यांच्या गाडीवर जाण्याचा निर्धार केला पाहिजे असल्याचे मत शिवराय कुळकर्णीप्रवक्ता, भाजपा, महाराष्ट्र यांनी निवेदनातून केले आहे.

# दर्यापूरात चड्डी बनियन गँगचा धाडसी प्रयत्न फसला

## सायरन वाजताच १०-१२ चोरटे पसार




विदर्भ प्रजासत्ताकदि.२७ दर्यापुर १६अमरावती जिल्ह्यातील दर्यापूर शहरात पुन्हा एकदा चड्डी बनियन गँगची दहशत पाहायला मिळाली आहे. गौरक्षण चौक परिसरातील तळोकार ज्वेलर्स या दागिन्यांच्या दुकानात मध्यरात्री चोरीचा प्रयत्न करण्यात आला. ही घटना रात्री ३ ते ३.३० वाजण्याच्या सुमारास घडली.माहितीनुसार, १० ते १२ अज्ञात चोरट्यांनी दुकानाचे शटर फोडून आत प्रवेश करण्याचा प्रयत्न केला. मात्र शटर तुटताच दुकानात बसविण्यात आलेल्या अत्याधुनिक सुरक्षा यंत्रणेतील सेन्सर सक्रिय झाले आणि जोरदार सायरन वाजू लागला. अचानक मोठा आवाज झाल्याने चोरटे घाबरले आणि कोणतीही चोरी न करता घटनास्थळावरून तात्काळ पळ काढला.या घटनेमुळे परिसरात मोठी खळबळ उडाली असून नागरिकांमध्ये भीतीचे वातावरण निर्माण झाले आहे. विशेष म्हणजे, घटनास्थळाजवळच जेस्तंभ चौकात पोलीस पेट्रोलिंग गाडी उपस्थित असतानाही चोरट्यांनी चोरीचा प्रयत्न केल्याने पोलिसांच्या गस्त व्यवस्थेवर प्रश्नचिन्ह उपस्थित झाले आहे.दर्यापूर पोलिसांनी घटनास्थळी पाहणी करून अज्ञात चोरट्यांचा शोध सुरू केला असून परिसरातील सीसीटीव्ही फुटेज तपासले जात आहेत. या घटनेमुळे शहरातील सुरक्षा व्यवस्थेबाबत नागरिकांकडून चिंता व्यक्त केली जात आहे.

### परतवाडा लैंगिक शोषण प्रकरण


# ५ आरोपींचा MCR मंजूर आरोपींची कारागृहात रवानगी

## उजैर खान इक्बाल खान दुसऱ्या गुन्ह्यात ताब्यात

**विदर्भ प्रजासत्ताक दि.२७अमरावती**

संपूर्ण राज्यभरात चर्चेचा विषय ठरलेल्या परतवाडा लैंगिक शोषण प्रकरणात आणखी एका १६ वर्षीय पीडित मुलीने तक्रार दाखल केली असून मुख्य आरोपी अयान याने तिच्या मर्जीशिवाय तिला स्पर्श केल्याचे तिने विशेष तपास पथकातील महिला अधिकाऱ्यांसमक्ष सांगितले आहे. अयानच्या विरोधातील मूळ गुन्ह्यात विनयभंगाचा गुन्हा समाविष्ट करण्यात आला आहे.

या प्रकरणात पीडित किंवा त्यांच्या पालकांनी पोलिसांकडे तक्रार दाखल करण्याचे आवाहन पोलिसांनी केले होते. त्यांची नावे गोपनीय ठेवण्यात येतील, असेही पोलिसांनी स्पष्ट केले होते. दरम्यान, आज आणखी एक पीडित मुलगी तिच्यावर झालेल्या अन्यायाबाबत समोर आली आहे. तिने एसआयटीच्या महिला अधिकाऱ्यांसमोर आपली जबाब नोंदवला. त्याआधारे पोलिसांनी भारतीय न्याय संहितेच्या कलम ७४ अन्वये गुन्हा मूळ गुन्ह्यात



**५ आरोपी कारागृहात**

परतवाडा लंगिक शोषण प्रकरणी आज मा. न्यायालयाने ५ आरोपींचा चउठ मंजूर केला असल्याने त्यांना कारागृहात दाखल करण्यात येणार आहे.या पाच पैकी एक आरोपी नामे उजैर खान इक्बाल खान यास दुसऱ्या गुन्ह्यात ताब्यात घेण्यात आले आहे.

समाविष्ट केला. या प्रकरणाचा पुढील तपास परतवाडा पोलीस करीत आहेत.

पीडित किंवा त्यांच्या पालकांनी कोणत्याही दडपणाला किंवा भीतीला बळी न पडता धैर्याने समोर येऊन आपला जबाब नोंदवावा. जबाब देण्यासाठी पुढे येणाऱ्या प्रत्येक पीडितेची ओळख पूर्णपण गप्प ठेवण्याची कायदेशीर खबरदारी पोलिसांकडून घेतली जात आहे, असे पोलिसांनी स्पष्ट केले आहे.

# छत्री तलाव स्वच्छतेतून ‘जनसेवा दिवस’ची सुरुवात

## आ. रवि राणा यांचा पर्यटन विकासाचा निर्धार

**विदर्भ प्रजासत्ताक दि.२७अमरावती –**

आमदार रवी राणा यांच्या जनसेवा दिवस निमित्त विविध उपक्रमांची सुरुवात करण्यात आली असून, छत्री तलाव परिसरात स्वच्छता अभियान राबवून या दिवसाची अर्थपूर्ण सुरुवात करण्यात आली. पहाटे ६ वाजल्यापासून आमदार राणा व भाजपा नेत्या तथा माजी खासदार नवनीत राणा यांनी स्वतः श्रमदान करत नागरिकांना स्वच्छतेचा संदेश दिला.

या स्वच्छता मोहिमेत युवा स्वाभिमान चे पदाधिकारी, नगरसेवक, मनपा अधिकारी व कर्मचारी तसेच आपत्ती व्यवस्थापन विभागाचे अधिकारी मोठ्या संख्येने सहभागी झाले होते. तलाव परिसरातील





साचलेला गाळ, गोटे, काचेचे तुकडे काढण्यात आले तसेच पाण्यात विसर्जित झालेल्या देव–देवतांच्या मूर्ती बाहेर काढून त्यांची योग्य ठिकाणी व्यवस्था करण्यात आली. या उपक्रमातून छत्री तलाव कायमस्वरूपी स्वच्छ व सुंदर ठेवण्याचा निर्धार व्यक्त करण्यात आला.

यावेळी आ. रवि राणा यांनी छत्री तलावाच्या विकासाबाबत महत्त्वपूर्ण घोषणा केली. तलावाचे सौंदर्यीकरण करून या ठिकाणाला पर्यटनाच्या दृष्टीने विकसित करण्याचा मानस त्यांनी व्यक्त केला.

यासाठी महाराष्ट्राचे मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस तसेच संबंधित मंत्र्यांकडे २५ कोटी रुपयांच्या निधीची मागणी करण्यात येणार असल्याचे त्यांनी सांगितले. प्रस्तावित आराखड्यात तलाव परिसराचे सुशोभीकरण, छत्रपती शिवाजी महाराज यांचा भव्य पुतळा उभारणे, पर्यटकांसाठी अतिरिक्त बोटी उपलब्ध करून देणे तसेच तलावात तरंगते रेस्टॉरंट सुरू करण्याचा समावेश आहे.

जनसेवा दिवसानिमित्त स्वच्छता अभियानात सहभागी झालेल्या कार्यकर्ते व नागरिकांचा सन्मान करण्यात आला. प्रत्येकाला एक झाड व प्रमाणपत्र देऊन पर्यावरण संवर्धनाचा संदेश देण्यात आला. मोठ्या प्रमाणात नागरिकांच्या सहभागामुळे हा उपक्रम उत्साहात पार पडला.

या प्रसंगी अनेक मान्यवर, नगरसेवक व पदाधिकारी उपस्थित होते.

जनतेच्या सहभागातून स्वच्छता व विकास साध्य होतो, असा विश्वास व्यक्त करत पुढील काळातही अशा सामाजिक उपक्रमांना गती देण्याचा संकल्प आ. रवि राणा यांनी यावेळी व्यक्त केला.–

# महामार्गावरील कडुनिंबाच्या झाडांची जाळपोळ

## हिरव्या वनसंपदेचा खुलेआम नाश ; संबंधित विभागांची कारवाई शून्य

**विदर्भ प्रजासत्ताक दि.२७अमरावती–**

अमरावती–परतवाडा महामार्गावर गेल्या आठ दिवसांपासून कडुनिंबाच्या हिरव्यागार झाडांची खुलेआम जाळपोळ होत असल्याच्या घटना सातत्याने समोर येत आहेत. शेकडो वर्षांची वनसंपदा असलेल्या या झाडांना अज्ञात व्यक्तींनी लक्ष्य केले असून, या प्रकाराकडे संबंधित विभागांकडून पूर्णतः दुर्लक्ष होत असल्याचा आरोप पर्यावरणप्रेमी व नागरिकांकडून केला जात आहे. महामार्गालगत दुतर्फा उभ्या असलेल्या कडुनिंबाच्या झाडांमुळे परिसराला हिरवळ लाभली होती. मात्र, अलीकडच्या काळात या झाडांना जाणीवपूर्वक आग लावण्याचे प्रकार वाढले असून, त्यामुळे पर्यावरणीय संतुलनाला मोठा धोका निर्माण झाला आहे. या जाळपोळीमुळे केवळ झाडांचे नुकसान होत नाही, तर पक्षी, लहान जीवसृष्टी आणि परिसरातील हवा प्रदूषित होत आहे. विशेष म्हणजे, या गंभीर प्रकाराकडे वन विभाग, सार्वजनिक बांधकाम विभाग तसेच स्थानिक प्रशासनाकडून



कोणतीही ठोस कारवाई होत नसल्याने नागरिकांमध्ये संताप व्यक्त केला जात आहे. तसेच, या प्रश्नावर अद्याप कोणत्याही राजकीय पक्षाने किंवा सामाजिक संघटनांनीही पुढाकार घेतलेला दिसून येत नाही. जर याकडे वेळेत लक्ष दिले नाही, तर महामार्गालगतची संपूर्ण हिरवीगार वनसंपदा नष्ट होण्याची भीती व्यक्त केली जात आहे. त्यामुळे संबंधित प्रशासनाने तातडीने या प्रकाराची दखल घेऊन दोषींवर कडक कारवाई करावी, अशी मागणी नागरिकांकडून होत आहे.

सांध्य दैनिक
विदर्भ प्रजासत्ताक
https://epaper.vidarbhaprajasattak.com, follow us on

